नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २६६ | Issue - 266 | वार बुधवार दि. १२ फेब्रुवारी २०२५ | Blow- Wednesday Date 12 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ‘एआय’चे लोकशाहीकरण आवश्यक

## पॅरिस कृती परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आग्रह



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पॅरिस/नवी दिल्ली : कृत्रिम बुद्धिमत्तेशी (एआय) संबंधित संसाधने आणि क्षमतानिर्मितीमध्ये लोकशाही पद्धतीने सर्वांना मुभा असावी, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केले. पॅरिसमध्ये सुरू झालेल्या ‘एआय कृती शिखर परिषदे’मध्ये ते बोलत होते. परिषदेदरम्यान झालेल्या एका गोलमेज परिषदेतही भारत आणि फ्रान्सने एआयच्या लोकशाहीकरणाचा आग्रह धरला.

एआय क्षेत्रासाठी जागतिक चौकट आखण्यासाठी ‘ओपन सोर्स’च्या धर्तीवर सामूहिक प्रयत्न करणे आहे. जेणेकरून विश्वास, पारदर्शकता वाढण्याबरोबरच दुटप्पीपणापासूनही हे क्षेत्र दूर राहील,’ असे पंतप्रधान म्हणाले. धोरणे, अर्थव्यवस्था, सुरक्षा, समाज ‘एआय’मुळे बदलत आहे. मानवी समुदायासाठी ‘एआय’ ही या शतकातील एक संहिता असेल. आपली मूल्यव्यवस्था, परस्परविश्वास, संभाव्य धोके यांकरिता प्रशासन व्यवस्था तयार करण्यासाठी जागतिक पातळीवर सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. ‘एआय’ तंत्रज्ञान स्वीकारण्यात भारताने आघाडी घेतली आहे. सार्वजनिक हितासाठी आम्ही ‘एआय’चा वापर करण्यावर भर देत आहोत. ‘एआय’वर आधारित भविष्यासाठी कौशल्यशिक्षणामध्ये गुंतवणूक करण्याची गरज असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

शिखर परिषदेदरम्यान झालेल्या गोलमेज परिषदेत दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झालेले केंद्र सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार अजय कुमार सूद यांनीही तंत्रज्ञानाच्या लोकशाहीकरणाचा आग्रह धरला. भारत आणि फ्रान्सने विविध स्तरांवर धोरणात्मक पातळीवर आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एकत्रित पुढे जायची गरज आहे. केवळ द्विस्तरावरील संबंधांना याचा फायदा होईल असे नव्हे, तर जागतिक स्तरावर त्याचा उपयोग होईल. ‘एआय’चा वापर जबाबदार पद्धतीने करण्यावर भारताचा भर राहील, असे सूद या वेळी म्हणाले. ‘एआय’च्या बाबतीत विविध देशांमधील मतभिन्नता शिखर परिषदेच्या निमित्ताने समोर आली. युरोपने ‘एआय’च्या नियमनावर आणि गुंतवणुकीच्या संदर्भात भर दिला तर चीनने सरकारपुरस्कृत कंपन्यांच्या माध्यमातून ‘एआय’च्या विस्ताराचा आग्रह धरला.

फ्रान्समध्ये भारतीय समुदायाकडून मोदींचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले आहे. मोदी म्हणाले, ‘पॅरिसमध्ये स्मृतीत कायम राहील असे स्वागत झाले. प्रेम व्यक्त करताना येथील थंडीचा परिणामही भारतीय समुदायावर झाला नाही. भारतीय समुदायाने साध्य केलेल्या उपलब्धींचा सार्थ अभिमान आहे.’ तर फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल माक्राँ यांनीदेखील गळाभेट घेऊन पंतप्रधानांचे स्वागत केले. पॅरिसमध्ये रात्रीच्या मेजवानीला उपस्थित राहिल्यानंतर उभयतांत अनौपचारिक संवाद झाला. ‘माझे मित्र माक्राँ यांना भेटून आनंद झाला,’ अशी टिप्पणी मोदी यांनी ‘एक्स’वर केली. या वेळी मोदी यांनी अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. वान्स यांचीही भेट घेतली व निवडणुकीतील विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या.

एआय क्षेत्रात अतिरिक्त नियमन केले, तर हे क्षेत्र जसे उभारी घेत आहे तितक्याच वेगाने ते संपेल, असा इशारा अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. वान्स यांनी दिला. ते म्हणाले की, अमेरिकेत तयार होणारी ‘एआय’ यंत्रणा कुठल्याही प्रकारच्या विचारधारेची पुरस्कृत नसेल, याची काळजी ट्रम्प प्रशासन घेईल. नागरिकांच्या भाषणस्वातंत्र्यावर कुठल्याही प्रकारे गदा आणणार नाही. एका नव्या औद्योगिक क्रांतीला आपण सामोरे जात आहोत. वाफेच्या इंजिनचा शोध लागल्यानंतर जी औद्योगिक क्रांती झाली, त्याच्याच तोडीची ही क्रांती आहे, असे वान्स म्हणाले.

# माघी पौर्णिमेच्या अमृत स्नानापूर्वी प्रयागराजमध्ये वाहन बंदी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : महाकुंभाच्या निमित्ताने प्रयागराजमध्ये होणारी गर्दी पाहून प्रशासनाने मंगळवारी, माघी पौर्णिमेच्या आदल्या दिवसापासून शहरामध्ये नव्याने येणाऱ्या वाहनांना प्रवेशबंदी केली आहे. महाकुंभातील तिसरे अमृत स्नान बुधवारी माघी पौर्णिमेच्या मुहूर्तावर होत आहे. त्यानंतर कल्पवास कालावधी समाप्त होईल. भाविकांची वाढती गर्दी, गेल्या काही दिवसांमधील वाहतुकीची कोंडी, लोकांची गैरसोय या बाबी विचारात घेऊन प्रशासनाने वाहतुकीच्या नियमांमध्ये बदल केले आहेत.

महाकुंभाची जागा वाहनमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आहे. आपत्कालीन आणि अत्यावश्यक सेवांना या नियमातून वगळण्यात आल्याचे सरकारी निवेदनात नमूद करण्यात आले. यापूर्वी २९ जानेवारीच्या मौनी अमावस्येच्या अमृत स्नानाच्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत किमान ३० जणांचा मृत्यू झाला होता. त्या पार्श्वभूमीवर, भाविकांची सुरक्षा विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आपत्कालीन परिस्थिती उद्भवून भाविकांना महाकुंभ क्षेत्रातून बाहेर काढण्याची वेळ आली तर विशेष वाहतूक योजना आखण्यात आली आहे. दरम्यान, कुंभमेळ्यात आतापर्यंत ४५ कोटींपेक्षा जास्त भाविकांनी संगम स्नान केल्याची माहिती उत्तर प्रदेश सरकारने मंगळवारी दिली.

# शिवसेना मंत्र्यांची नाराजी, अधिकारांवर गदा येत असल्याची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मंत्र्यांच्या अधिकारांवर गदा येत असल्याने शिवसेना (एकनाथ शिंदे) मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही या वेळी उपस्थित होते. याखेरीज नाशिक तसेच रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद मिटलेला नाही. याबाबतच्या वार्षिक योजना मंजुरीच्या बैठकांना शिंदे गटाचे मंत्री गैरहजर राहिले.


मंत्रिमंडळाचे नियोजित मुद्द्यांचे कामकाज आटोपल्यावर अधिकारी बैठकीतून बाहेर पडल्यावर हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. भरत गोगावले यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्यानंतर त्यांनी एसटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. या रिक्त पदाचा कार्यभार परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे न देता अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांच्याकडे सोपविण्याचे आदेश सरनाईक यांना अंधारात ठेवून काढण्यात आले.

उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यापुढे अनेक विषय न ठेवता परस्पर त्यास मंजुऱ्या देण्यात येत आहेत. सामंत यांनी यासंदर्भात उद्योग खात्याचे प्रधान सचिव आणि एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्रही पाठविले असून सर्व महत्त्वाचे विषय मंजुरीसाठी आपल्यापुढे ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासंदर्भातही मुख्यमंत्र्यांपुढे मंगळवारी मुद्दा उपस्थित करण्यात आला. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून मंत्र्यांच्या अधिकारांवर गदा येत असल्याने नाराजी व चिंता व्यक्त करण्यात आली.रायगड जिल्ह्याची वार्षिक योजना मंजूर करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आयोजित केलेल्या बैठकीला रोजगार हमीमंत्री भरत गोगावले हे अनुपस्थित असल्याने बैठक लांबणीवर टाकावी लागली. रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे आणि शिवसेनेचे भरत गोगावले असे दोन मंत्री आहेत. आदिती तटकरे बैठकीला उपस्थित होत्या. तर भरत गोगावले यांनी रायगडवरील किल्ले धारातीर्थ मोहिमेच्या सांगता कार्यक्रमामुळे उपस्थित राहू शकलो नाही असे सांगितले. आमच्यात धुसफुस वगैरे काही नाही, असा खुलासा अजित पवार यांनी बैठकीनंतर केला.

रायगडाबरोबरच नाशिकच्या पालकमंत्रीपदाला स्थगिती देण्यात आली आहे. नाशिक जिल्हा वार्षिक योजनेला मंजुरी देण्याच्या बैठकीस शिवसेनेचे दादा भुसे उपस्थित नव्हते. रायगड आणि नाशिक या दोन्ही जिल्ह्यांतील शिवसेनेचे मंत्री अजित पवारांकडील बैठकीला उपस्थित नव्हते.

# सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द करा : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : दहावी व बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारीबाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री उपस्थित होते.

इयत्ता बारावीची परीक्षा आजपासून १८ मार्चपर्यंत ३,३७३ परीक्षा केंद्रावर होणार आहे.

दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत ५,१३० परीक्षा केंद्रावर होणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याचे माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देतांना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत याची खबरदारी घ्यावी , भरारी पथकाद्वारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित आहे, अशा सूचना दिल्या.

सर्व परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष बैठ्या पथकाची नियुक्ती करण्यात यावी, बैठया पथकाने परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास परीक्षा केंद्रावर पोहोचावे व परिक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत नियंत्रण ठेवावे,संवेदनशील केंद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिका-यांची बैठया पथकात नेमणूक करावी. असेही त्यांनी सांगितले.

संवेदनशील परिक्षा केद्रांवर ड्रोन कॅमेराव्दारे आणि व्हिडीओ कॅमेराव्दारे पूर्णवेळ निगराणी करावी, सर्व तालुक्यातील परिक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन व व्हिडीओ कॅमेरे कार्यरत असावेत यावर निगराणी ठेवण्याकरिता जिल्हाधिका-यांनी प्रत्येक तालुक्याकरिता एक विभाग-प्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी, अशा सूचना दिल्या.

परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडणे ही जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संयुक्त जबाबदारी राहील. शहरी भागात पोलीस आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांची जबाबदारी राहील, त्यानुसार काम काज करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. इंग्रजी भाषा, गणित व विज्ञान विषयांच्या परीक्षेच्या दिवशी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवेदनशील केंद्रांना स्वत: भेटी द्याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले.

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ‘उमेद मॉल’

‘महालक्ष्मी सरस’ हा अत्यंत लोकप्रिय उपक्रम आहे. राज्यभरातील बचतगटांना हक्काचे विक्रीचे साधन उपलब्ध व्हावे, यासाठी प्रायोगिक तत्त्वावर १० जिल्ह्यांत आणि नंतर टप्प्याटप्प्याने ‘उमेद मॉल’ तयार करण्यात येणार आहेत. राज्यात एक कोटी ‘लखपती दीदी’ करण्याचाही संकल्प आहे. सध्या १८ लाख लखपती दीदी असून मार्चपर्यंत २५ लाख लखपती दीदींची उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी येथे केले. ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद व राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने बांद्रा-कुर्ला संकुल (बीकेसी) येथे ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंगळवारी केले. या वेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले, ‘उमेद’चे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश सागर आदी उपस्थित होते. ‘उमेदच्या’च्या माध्यमातून ‘महालक्ष्मी सरस’ हा राज्यभरात महिला बचतगटांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा उपक्रम झाला आहे. महिला बचतगटांची उत्पादने खूप चांगली असतात. त्यांच्या विक्रीसाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जिल्हा परिषदेच्या परिसरात उमेद अभियानाच्या माध्यमातून मॉल उभारण्यात येतील व त्यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित

## एकनाथ शिंदे आणि शरद पवार एकाच व्यासपीठावर

# ‘शरद पवारांची गुगली अनेकांना कळत नाही, पण मला अजून गुगली टाकली नाही’ : शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या हस्ते दिल्लीत ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमात महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. यावेळी एकनाथ शिंदे यांनी भाषण केलं. एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात शरद पवार यांच्या मुत्सद्दी राजकारणावर भाष्य करत चांगलीच शाब्दिक फटकेबाजी देखील केली. शरद पवारांची राजकारणातील गुगली अनेकांना कळत नाही. कधीकधी बाजूला बसलेल्या लोकांची किंवा बसवलेल्या लोकांनाही गुगली समजत नाही, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

पुरस्कार ज्यांच्या नावे आहे ते आहेत महापराक्रमी महादशी शिंदे. तुम्ही मला पुरस्कार दिलात तो मी आहे एक कार्यकर्ता एकनाथ शिंदे, आणि इथे पुरस्कार देताना उपस्थित आहेत ज्योतिरादित्य शिंदे. ज्यांनी मला हा पुरस्कार दिला त्यांचे आडनाव पवार असलं तरी देशाचे थोर क्रिकेटपटू सदाशिव शिंदे यांचे ते जावई आहेत. शेवटी शिंदे सगळे आले. सदाशिव शिंदे भारताचे स्पिन बॉलर होते. त्यांची गुगली भल्याभल्यांना कळत नव्हती. फलंदाज कधी क्लीन बोल्ड व्हायचा कळायचं देखील नाही. पवार साहेबांची देखील राजकारणातील गुगली सुद्धा अनेकांना कळत नाही.



कधीकधी बाजूला बसलेल्या लोकांची किंवा बसवलेल्या लोकांची गुगली समजत नाही. पण मी माझ्याबद्दल थोडं वेगळं सांगतो. माझे आणि पवार साहेबांचे प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांनी आजवर मला कधी गुगली टाकली नाही. यापुढेही टाकणार नाहीत, असा विश्वास आहे, अशी शाब्दिक फटकेबाजी एकनाथ शिंदे यांनी दिल्लीतल्या कार्यक्रमात केली.

माझ्यासाठी हा एक आगळावेगळा पुरस्कार आहे. सर्वोप्रथम दिल्लीचे तख्त राखणारे महापराक्रमी महादजी शिंदे यांना वंदन करतो. खरं म्हणजे मला आज थोर सेनानी महानायक महादजी शिंदे राष्ट्रगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. पुरस्कार, सन्मान हे विचारवंत, कलावंत आणि साहित्यिकांसाटी असतात. राजकारण्यांसाठी फार कमी असतात. राजकारण्यांना कमी दिले जातात. त्यामुळे हा पुरस्कार स्वीकारताना मनामध्ये संकोच होता. पण आपलं प्रेमही होतं की, ज्या जिव्हाळ्याने, प्रेमाने, आपुलकीने आपण हा पुरस्कार मला प्रदान केला त्याबद्दल मी धन्यवाद देतो, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

महापराक्रमी महादजी शिंदे यांच्या नावाचा हा पुरस्कार आहे. त्यामुळे आणखी थोडं दडपण होतंच. पुरस्कार देवून इथे जो सन्मान दिलाय याबद्दल धन्यावद. पण या सन्मानामुळे येणारी जबाबदारी मोठी आहे याची जाणीव मला आहे. खरं म्हणजे जेव्हा एखाद्याच्या पाठीवर चांगलं काम केल्याची शाबासकी मिळते तेव्हा त्याच्यावरची आणखी जबाबदारी वाढते. त्या व्यक्तीला आणखी चांगलं काम करावं लागतं, असं शिंदे म्हणाले.

शरद पवारांसारख्या ज्येष्ठ आणि जाणत्या नेत्याच्या हस्ते हा पुरस्कार मिळावा हा देखील एक भाग्याचा योग आहे. या पुरस्काराच्या निमित्ताने वेगवेगळे योग जुळून आले आहेत. महादजी शिंदे यांचं घराण हे सातारा जिल्ह्यातील कन्हेरखेड. या महापराक्रमी लढवय्यांच्या जन्मभूमीतच माझाही जन्म झालेला आहे. हे देखील मी माझं मोठं भाग्य समजतो, असं देखील एकनाथ शिंदे म्हणाले.

## संपादकीय....

# नाराजीनाट्य

मंत्र्यांच्या अधिकारांवर गदा येत असल्याने शिवसेना (एकनाथ शिंदे) मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही या वेळी उपस्थित होते. याखेरीज नाशिक तसेच रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद मिटलेला नाही. याबाबतच्या वार्षिक योजना मंजुरीच्या बैठकांना शिंदे गटाचे मंत्री गैरहजर राहिले. मंत्रिमंडळाचे नियोजित मुद्द्यांचे कामकाज आटोपल्यावर अधिकारी बैठकीतून बाहेर पडल्यावर हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. भरत गोगावले यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्यानंतर त्यांनी एसटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. या रिक्त पदाचा कार्यभार परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे न देता अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांच्याकडे सोपविण्याचे आदेश सरनाईक यांना अंधारात ठेवून काढण्यात आले. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यापुढे अनेक विषय न ठेवता परस्पर त्यास मंजुऱ्या देण्यात येत आहेत. सामंत यांनी यासंदर्भात उद्योग खात्याचे प्रधान सचिव आणि एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्रही पाठविले असून सर्व महत्त्वाचे विषय मंजुरीसाठी आपल्यापुढे ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासंदर्भातही मुख्यमंत्र्यांपुढे मंगळवारी मुद्दा उपस्थित करण्यात आला. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून मंत्र्यांच्या अधिकारांवर गदा येत असल्याने नाराजी व चिंता व्यक्त करण्यात आली.रायगड जिल्ह्याची वार्षिक योजना मंजूर करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आयोजित केलेल्या बैठकीला रोजगार हमीमंत्री भरत गोगावले हे अनुपस्थित असल्याने बैठक लांबणीवर टाकावी लागली.

# दुबई साखर परिषद जागतिक साखर उद्योगासाठी दिशादर्शक : हर्षवर्धन पाटील

## जगातील ७० देशाचा सहभाग; जागतिक साखर उद्योगाची ९ वी दुबई साखर परिषद





दुबई येथे जागतिक साखर परिषदेत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व मान्यवर.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी :अतुल सोनकांबळे : जगातील साखर उद्योग हा एक महत्वाचा उद्योग मानला जात आहे. सध्या जगात प्रत्येक उद्योगांमध्ये स्थित्यंतरे येत असल्याने जागतिक साखर उद्योगापुढील संभाव्य समस्यांवर सखोल उहापोह या परिषदेत केला जाणार असून, त्यांचे निराकरण करण्यासंदर्भातही सामूहिक विचारमंथन होणार आहे. त्यामुळे दुबई साखर परिषद ही जागतिक साखर उद्योगासाठी दिशादर्शक ठरणार आहे, असे प्रतिपादन भारताच्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी मंगळवारी (दि.११) केले.

दुबई येथे सोमवार दि.१० ते गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत जागतिक साखर उद्योगाची ९ वी दुबई साखर परिषद २०२५ चालु झाली आहे. या दुबई साखर परिषदेमध्ये भारताच्या साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, अमित देशमुख, इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या अंकिता पाटील ठाकरे, निहार ठाकरे, व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे तसेच भारत सरकारचे सचिव दर्जाचे अधिकारी सहभागी झाले आहेत. या शुगर परिषदेमध्ये जगातील सुमारे ७० देशातील साखर उद्योगाच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला आहे.

हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, दुबई शुगर परिषदेमध्ये डिजिटल शेती, ऊस पिकासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार, पाण्याच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक संकल्पना, नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी भांडवल जमवणे, साखरेच्या आरोग्यासंदर्भातील चुकीच्या अफवा, तापमान वाढीची चिंता या संदर्भात चर्चा होणार आहेत. जागतिक तापमान हे १ अंश पेक्षा अधिक सेल्सिअसने वाढलेले आहे. सन २०२४ हे वर्ष उच्चांकी उष्णतेचे ठरले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या म्हणण्यानुसार जागतिक तापमान वाढ होत राहणार आहे. तसेच येऊ घातलेली संभाव्य मंदी, वातावरणातील बदल, डॉलरची ताकद आदि संदर्भातही चर्चा या परिषदेत होईल.

जगामध्ये प्रगत अर्थव्यवस्थांमधील आर्थिक आणि वित्तीय धोरणे जगाला मंदीकडे आणि दीर्घकाळापर्यंत स्तब्धतेकडे ढकलण्याचा धोका आहे, असे सध्या बोलले जात आहे. त्यामुळे २००८ मधील आर्थिक संकट आणि २०२० मधील कोविड-१९ पेक्षा साखर उद्योगाचे अधिक नुकसान होऊ नये म्हणून सतर्कता बाळगणे संदर्भातील विषयावर या परिषदेत चर्चा होईल. साखर उद्योगातील तंत्रज्ञान, आधुनिकता, साखर व्यापार, साखर उद्योगा पुढील आव्हाने या संदर्भात जगातील साखर उद्योगातील तज्ञ या परिषदेत विचार मांडणार आहेत, असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले.

### हर्षवर्धन पाटील यांचा चर्चासत्रात सहभाग!

**दुबई साखर परिषदेमध्ये 'भारतासाठी आपण पुढे काय पाहणार आहोत?' या विषयावरील चर्चासत्रात भारताच्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व मान्यवर प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. भारताचे साखर निर्यात धोरण, भारतामध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण, या संदर्भातही यावेळी हर्षवर्धन पाटील मत मांडतील.**

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले परीक्षार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


पंढरपूर :भारताचे उपक्रमशील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करून परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे आवाहन केले. यावेळी स्वेरी अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांतील सर्व वर्गात या लाईव्ह उपक्रमाची व्यवस्था केली होती. याचा इंजिनिअरिंग व फार्मसी मधील पदविकेपासून ते पदव्युत्तर पदवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

केंद्रीय मंत्रालयाच्या 'मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन' यांच्या आदेशाने व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) यांच्या सूचनेनुसार तसेच स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार यांच्या सहकार्याने डिप्लोमा इंजिनिअरिंग, डिग्री इंजिनिअरिंग, डिप्लोमा फार्मसी व डिग्री फार्मसी मधील विद्यार्थ्यांना 'परीक्षा पे चर्चा २०२५' या लाईव्ह उपक्रमाचा आनंद घेता आला. सध्या परीक्षेचे दिवस असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परीक्षेला कसे सामोरे जावे, आपला हेतू काय असावा, परीक्षा देताना आपली मानसिकता कशी असावी? याबाबत सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत एक तास मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थ्यांना व भविष्यात परीक्षेला सामोरे

### 'स्वेरी'च्या विद्यार्थ्यांनी घेतला 'परीक्षा पे चर्चा २०२५' लाईव्ह उपक्रमाचा फायदा

जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या बहुमोल मार्गदर्शनाचा फायदा होणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी ओघवत्या शैलीत अभ्यासपूर्ण भाषण केले. यामुळे परीक्षार्थ्यांचे मनोबल वाढले असून ते आत्मविश्वास पूर्वक परीक्षा देण्यासाठी सज्ज झाले आहेत. तासभर केलेल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता भविष्याचा विचार करून शांतपणे वर्तमानकाळात अभ्यास करण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदी यांच्या प्रवाही भाषणानंतर विद्यार्थी अधिक उत्साही झाल्याचे जाणवले. डिग्री फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डिप्लोमाइंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ डिप्लोमा फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे आणि डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली इंजिनिअरिंग (पदवी व पदविका) व फार्मसी (पदवी व पदविका) महाविद्यालयात या 'परीक्षा पे चर्चा' प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रत्येक वर्गात, तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट हॉलमध्ये या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय करण्यात आली होती. या थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती यांच्यासह सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, सर्व वर्गशिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांना पितृशोक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मा.आ. प्रशांत परिचारक यांना पितृषोक. माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे वडील अँड प्रभाकर उर्फ बाबा रामचंद्र परिचारक (वय ९५) यांचे वृद्ध काळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात माजी आमदार प्रशांत परिचारक, कारखान्याचे अध्यक्ष उमेश परिचारक, महेश परिचारक हे तीन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे.

माजी आमदार स्वर्गीय सुधाकर पंत परिचारक यांचे थोरले बंधू असणाऱ्या प्रभाकर परिचारक यांनी त्यांच्या राजकीय सामाजिक कार्यात खंबीरपणे पाठीमागे राहून मोठी जबाबदारी पार पाडली होती. पंढरपूर येथील न्यायालयात काही वर्ष त्यांनी वकील म्हणून ही काम केले होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजतात पंढरपूर शहर व तालुक्यातील मोठ्या संख्येने नागरिकांनी अंतर्जनासाठी गर्दी केली होती. येथील वैकुंठ स्मशानभूमी सायंकाळी साडेसहा वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सोयाबीन हमीभाव फरक देण्यासाठी सहकार मंत्र्यांना साकडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : राज्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन हमीभाव फरकाची रक्कम सरकारने द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोषभाऊ सोमवंशी यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे केली. आगामी मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत आपण विषय मांडू, अशी ग्वाही यावेळी सहकार मंत्री पाटील यांनी दिल्याची माहिती सोमवंशी यांनी दिली.

शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख संतोषभाऊ सोमवंशी यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सोमवारी सत्कार केला. शिरूर ताजबंद येथे इंद्रायणी

### राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती सोमवंशी यांनी केला ना. बाबासाहेब पाटील यांचा सत्कार

निवासस्थानी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची सोमवारी सकाळी संतोष भाऊ सोमवंशी व सहकाऱ्यांनी भेट घेतली यावेळी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न सोमवंशी यांनी सहकार मंत्र्यांकडे मांडला. राज्यातील बाजारात सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी भाव मिळत आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचे सोमवंशी यांनी सहकार मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. या शेतकऱ्यांना होणारे नुकसान सोसणारे नाही असे सांगून अशा सोयाबीन उत्पादकांना बाजार भाव व हमीभाव यातील फरक रक्कम सरकारने द्यावी, अशी मागणी सोमवंशी यांनी यावेळी सहकार मंत्र्यांकडे केली. दरम्यान सहकार मंत्र्यांनी याबाबत बोलताना आगामी मंत्रिमंडळ बैठकीत आपण सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न मांडू, अशी ग्वाही यावेळी सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळास दिली.

यावेळी सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांचा सत्कार संतोषभाऊ सोमवंशी यांनी केला. याप्रसंगी शिवसेना चाकूर तालुकाप्रमुख नंदकुमार पवार, अँड. एस. जी. सुगरे, अमोल पाटील, योगेश पाटील आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस अकोले तालुका अध्यक्ष संजय फुलसुदर यांचा आमदार लहामटेंकडून सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी : अकोले तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (भटके विमुक्त विभाग) अकोले तालुका अध्यक्षपदी संजय रामचंद्र फुलसुंदर यांची निवड करण्यात आल्याने संजय फुलसुदर यांचा अकोल्याचे आमदार डॉ किरण लहामटे यांनी सत्कार केला.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (भटके विमुक्त विभाग) अकोले तालुका अध्यक्षपदी कोतुळ येथील युवक कार्यकर्ते संजय रामचंद्र फुलसुंदर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी( भटके विमुक्त विभाग) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड यांनी नुकतीच ही



निवड करण्यात आल्याचे जाहीर केले श्री संजय फुलसुंदर यांचे पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कडून त्यांची ही निवड केली आहे

युवक कार्यकर्ते संजय फुलसुंदर यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन व स्वागत करण्यात येत असून अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे, यांनी श्री फुलसुंदर यांचा सत्कार करून कामाला शुभेच्या दिल्या.

त्यांच्या निवडीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (भटके विमुक्त विभाग) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड, प्रदेश उपाध्यक्ष अंबादास धनगर, प्रदेश सरचिटणीत्रिशा मढेवारराष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अहिल्यानगर जिल्हाअध्यक्ष कपिल पवार, ज्येष्ठ नेते व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक सिताराम पाटील गायकर आदींनी श्री संजय फुलसुंदर यांचे अभिनंदन केले आहे यांनी अभिनंदन केले आहे.

राज्यात महायुतीचे सरकार असून राज्य सरकारच्या विविध योजना तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठांचे मार्गदर्शना खाली पक्षाचे विचार आणि ध्येयधोरण सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचे व या पुढील काळात पक्ष वाढीसाठी जोमाने काम केले जाईल असे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय फुलसुंदर यांनी सांगितले.



# संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त वाहन रॅलीस प्रचंड प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही माघ पौर्णिमेनिमित्त चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्याचा मानस केंद्रीय जयंती उत्सव समितीचा आहे. त्याच अनुषंगाने ११ फेब्रुवारी वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. राम नगर येथील संत रविदास महाराजांच्या मंदिरापासून वाहन रॅलीस प्रारंभ झाला. वाहन रॅलीचा शुभारंभ शिवसेना नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी समाजबांधवांची तसेच संत रविदास महाराजांना मानणार्या इतर समाज बांधवांचीही उपस्थिती होती. वाहन रॅलीला दुपारी १२.३० वाजता रथ समोर चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला. यापूर्वी चंद्रकांत खैरे यांनी संत रविदास महाराजांचे दर्शन घेतले. तसेच प्रार्थनाही केली.

वाहन रॅलीस रामनगरातून प्रारंभ झाला. तेथून मुकुंदवाडी, संत रविदास महाराज चौक एपीआय कॉर्नर, सिडको, औरंगपुरा महात्मा ज्योती फुले चौक, शाहू महाराज चौक, मिलकॉर्नर, भडकल गेट, अण्णा भाऊसाठे चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजी महाराज चौक, टी.व्ही. सेंटर मार्गे संत रविदास मंदिर एन-२ सिडको येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. याप्रसंगी मंदिरात समितीचे केंद्रीय जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी सोनटक्के यांच्या हस्ते संत रविदास महाराजांची आरती करण्यात आली. तसेच १२ रोजी जयंती निमित्त होणार्या कार्यक्रमांची रूपरेषाही समाजबांधवांना सांगितली. त्याच अनुषंगाने जय्यत तयारीला लागवे. जास्तीत जास्त संख्येने जयंती उत्सवात सहभागी होवून आपली उपस्थिती नोंदवण्याचे आवाहनही अध्यक्ष बालाजी सोनटक्के यांनी केले तसेच याप्रसंगी सुरेश गवळी कॉं भास्कर लहाने, वीं. चंद्रकांत गोरे, प्रवीण बोर्डे संजय चिकसे ,मदन भगुरे, दिलीप उंबरे ,भारत परमेश्वरी , राजू डोंगरे, रमेश सूरभैय्या गायक हरिदास पुसे, रघुनाथ पदमे ,माजी जीएसटी अधीक्षक रामेकर साहेब . विनोद पूरभे विकी फुलमाळी, आधी रविदासिया प्रेमी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### पिकअपने दुचाकीला ठोकरले

सोलापूर : केगाव ते हत्तुर बायपास रोड वरील राजस्थानी धाबा येथे अशोक लेलँड दोस्त वाहन क्रमांक एम एच २४ ए यु ६३७६ या गाडीने दुचाकी धडक दिल्याची घटना ९ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी ऋषिकेश सिद्राम पाटील (वय २४, रा. पाटील गल्ली, देगाव, ता. उत्तर सोलापूर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून राहुल राजेंद्र मोहिते (वय २६, रा. मु. पो. मस्सा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी व फिर्यादीचे मित्र महेश नामदेव चौगुले हे घरी जाण्यासाठी फिर्यादीच्या गाडीवर बसताना पिकप चालकाने भरधाव वेगाने बेधारकपणे निष्काळीपणाने गाडी चालवून फिर्यादीच्या दुचाकीला धडक दिली. यात फिर्यादीचा मित्र महेश गंभीर जखमी करण्यास तसेच दुचाकीचे नुकसान होण्यास कारणीभूत झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे .

# माघ यात्राः लाखो वारकरी भाविकांची यात्रा सुखरूप व भक्तीमय वातावरणात संपन्न

## मंदिर समितीकडून भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा; दर्शनासाठी ९ पत्राशेडची उभारणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ एकादशीचा मुख्य सोहळा दि. ०८ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. माघी यात्रेत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनाठी लाखो भाविक पंढरपूरात दाखल झाले होते. दर्शनरांगेतील भाविकांची वाढती गर्दी घेवून त्यांची गैरसोय होऊ नये तसेच दर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यासाठी ९ पत्राशेड उभारण्यात आले होते. यात्रा कालावधीत भाविकांसाठी मंदिर समितीकडून आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात आल्या होत्या. वारकरी भाविकांना चांगल्या व पुरेसा प्रमाणात सोई सुविधा झाल्याने लाखो वारकरी भाविकांची यात्रा सुखरूप व भक्तीमय वातावरणात संपन्न झाली.

भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी, दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून कायमस्वरूपी ४ पत्राशेड व्यतिरिक्त ५ जादा म्हणजे एकूण ९ पत्राशेडची उभारणी करण्यात आली होती. या दर्शनरांगेत विश्रांती कक्ष, सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, शौचालये, मिनरल वॉटर, लाईव्ह दर्शन, स्पिकरवर भक्तीगीते, चांगली स्वच्छता व्यवस्था, चहा व शाबुदाणा / तांदळाची खिचडी वाटप, अन्नछत्र, अपघात विमा पॉलीसी, रूग्णवाहिका, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल व इतर अनुषंगीक सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या.





मंदिर परिसर व दर्शनरांगेत अस्वस्थ झालेल्या सुमारे २५ ते ३० भाविकांना रूग्णवाहिकेद्वारे रूग्णालयात पोहोच केले, आकस्मित मयत झालेल्या २ भाविकांचे शव गावी पोहोच करण्यासाठी मोफत शववाहिका उपलब्ध करून दिली. याशिवाय, १ ते १० फेब्रुवारी पर्यंत सुमारे २ लाख भाविकांनी पदस्पर्शदर्शन व सुमारे ३ लाख भाविकांनी मुखदर्शन घेतले. स्वच्छतेबाबत विशेष लक्ष देऊन, मंदिर परिसर, दर्शनरांग, चंद्रभागा वाळवंट येथून दैनंदिन १५ ते २० टन कचरा उचलण्यात आला आहे. यासाठी श्री.ज्ञानेश्वर महाराज स्वयंसेवा कार्यकारी मंडळ (स्वकाम सेवा) आळंदी, विश्व सामाजीक सेवा संस्था आळंदी व श्री.संत ज्ञानेश्वर सेवा मंडळ आळंदी यांचेकडील सुमारे ३०० स्वयंसेवकांनी २ शिफ्टमध्ये सेवा दिली. तसेच पत्राशेड येथील अन्नछत्रासाठी संत मिराजी महाराज पुरूष व महिला सेवेधारी मंडळ, अकोला या संस्थेच्या स्वयंसेवकांनी सेवा दिली.

**सुमारे पाच लाख भाविकांनी पदस्पर्श दर्शन व मुखदर्शन घेतले**

महिला भाविकांसाठी चंद्रभागा वाळवंट येथे ८ चेंजिंग रूम व ३ हिरकणी कक्ष उभारण्यात आले आहेत. कायमस्वरूपी व तात्पुरत्या स्वरूपात १२८ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. श्री. संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे चौकशी कक्ष उभारून मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड व तेलगू भाषा अवगत असलेले कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.

याशिवाय, श्री. संत गजानन महाराज मठ अकोला यांचेकडील सुमारे २०० स्वयंसेवकांनी दर्शनरांगेत चहा व खिचडीची वाटपाची सेवा दिली. श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रात दैनंदिन ५००० ते ६००० भाविक व स्वयंसेवकांनी प्रसादाचा लाभ घेतला. त्यासाठी गिताई सेवाभावी संस्था औसा यांच्या ६० स्वयंसेवकांनी सेवा केली. देणगी जमा करण्यासाठी जादा २० स्टॉल उभारण्यात आले होते व देणगी संकलनाची सेवा श्री.विठ्ठल सेवा मंडळ, पुणे यांनी दिली. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पत्राशेड येथे तालुका वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत, दर्शनमंडप येथे उपजिल्हा रूग्णालय व माळवदावर वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली. चंद्रभागा नदीपात्रात भाविकांच्या सुरक्षततेच्या दृष्टीने व आपत्कालिन व्यवस्थेकामी ४० सुरक्षा रक्षक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांना पुरविले होते.

मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी माघ यात्रेत वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देणेबाबत चांगले नियोजन केले तसेच अधिनस्त कर्मचारी व स्वयंसेवकांनी देखील कर्तव्य चांगले पध्दतीने बजावल्याने लाखो वारकरी भाविकांची यात्रा सुखरूप व भक्तीमय वातावरणात संपन्न झाली.

## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यातील बहुजन समाजाचे नेते माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री ना. एकनाथरावजी शिंदे यांना वाढदिवसानिमित्त. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्प-गुच्छ देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.



यावेळी पत्रकारांच्या प्रश्नाविषयी अनेक प्रश्न प्रलंबित आहेत ते मार्गी लावण्यासाठी त्यांच्याशी चर्चा करून ते प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक. त्यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नाविषयी त्यांना प्रश्न सोडवण्यासाठी त्यांच्याशी चर्चा करण्यात आली.

## पंढरीत एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाने साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ रावजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त औचित्य साधून शिवसेना व युवा सेना व महेश (नाना) साठे, व प्रियांका परांडे अनिता माळगे, गणेश जाधव, महादेव भोसले यांच्याकडून कॉमन मॅन आणि अनाथांना आधार देण्याचे काम, नाथांचे नात म्हणून ओळखले जाणारे शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री नामदार एकनाथराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त गोरगरीब सामान्य नागरिकांमध्ये मिसळून समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा करण्याची उद्दिष्ट शिवसेनेने ठेवले होते.






या अनुषंगाने पंढरपुरात कॉमन मॅन म्हणून ओळखले जाणारे वयोवृद्ध नागरी अनाथ बालक आणि विद्यार्थ्यांमध्ये जाऊन वाढदिवसाच्या अवचित साधून शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर येथे शिवसेना व युवासेना सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून पक्षाच्या आदेशाचे पालन करण्यात आले.

यामध्ये पंढरपूर नदी असलेल्या पालवी येथील विद्यार्थ्यांना फळे व मिष्टांना भोजन देण्यात आली तसेच पंढरपुरातील राम कृष्ण हरी वृद्धाश्रम व गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रम येथील वृद्धांना मिस्टरांना भोजन देण्यात आले.

त्यावेळी सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, महिला आघाडी संपर्कप्रमुख अनिता माळगे, ड्युटी सेना महाराष्ट्र कार्यकारणी सदस्य तथा जिल्हाप्रमुख प्रियंका परांडे, लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतचे सरपंच संजय साठे, युवा सेना जिल्हाध्यक्ष गणेश जाधव, रणजीत जगताप युवासेना तालुकाप्रमुख महादेव भोसले, कृषी सेना विधानसभा प्रमुख पल्लवी जन्मले, ग्रामपंचायत सदस्य नागरबाई साठे, रेश्मा साठे, रोहिणी साठी, व ग्रामपंचायत सदस्य औदुंबर ढोणे अमोल भोसले रंजीत पवार कृष्णासाठी सुनिता जाधव पवार मॅडम उषा घाडगे लखन भोंडवे बापू उकिरडे योगेश गायकवाड समाधान कुरुंद अनिल घोडके अमोल लेंडवे विश्वास वसेकर समीर मुजावर इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री विठ्ठल सभा मंडप येथे औसेकर महाराजांचे चक्रीभजन संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सभा मंडप येथे औसेकर महाराजांचे चक्रीभजन संपन्न.

आषाढी, कार्तिकी, माघी, चैत्री, अशा चार प्रमुख यात्रा पंढरपुर येथे मोठ्या प्रमाणात भरतात. त्यापैकी मागीयात्रा संपन्न होत असून, यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराची संबंधित असलेल्या परंपराचे कटाक्षपणे पालन करण्यात येत आहे. माघी शुद्ध त्रयोदशीला श्री विठ्ठल रुक्मिणी सभा मंडप येथे ह.भ.प.औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाची परंपरा आहे. आज सोमवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी दुपारी तीन ते पाच या वेळात श्री विठ्ठल सभा मंडपात चक्रीभजन संपन्न झाले सदर चक्रीभजन सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी केले. यावेळी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतला ताई नडगिरी, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, तसेच सुमारे १००० ते दीड हजार भाविक उपस्थित होते शके सतराशे अठरा पासून आज तागायत चक्रीभजनाची परंपरा देगलूरच्या गुरा गुंडा महाराजांपासून संतांचे मूळ पुरुष सद्गुरु देरनाथ महाराज यांना मिळाली चक्रीभजन म्हणजे संसाराच्या चक्रातून, वह्यातून मुक्त करणारे भजन आहे या परंपरेमध्ये काही बसून तर काही उभारून भजन केले जाते, हे भजन नृत्य करत केले जाते देहांची विधेही अवस्था प्राप्त करून देते.

औसेकर घराण्याची १७९२ सालापासून माघ वारी काळात श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या सेवार्थ चक्रीभजनाची परंपरा अखंडपणे देण्याची सेवा औसेकर घराण्यातून केली जाते व या चक्रीभजनाच्या माध्यमातून १४ भजन म्हणले जातात चक्रीभजनांमध्ये वारकरी संप्रदाय पूर्णपणे रंगून जातो असे हौसा संस्थांचे अध्यक्ष तथा मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले मंदिर समितीने मंदिरात होणारे मोठे सोहळे, व कार्यक्रम विविध समाज माध्यमात लाईव्ह करण्यास सुरुवात केली आहे.

त्यानुसार सदर सोहळा मंदिर समितीचे अधिकृत संकेतस्थळ युट्युब व फेसबुक यासारख्या समाज माध्यम द्वारे लाईव्ह टेलिकास्ट करण्यात आला होता यामध्ये हजारो भाविकांनी घरबसल्या सोहळा पाहण्यात आला.

**सतत होणाऱ्या धुळीमुळे शाळकरी मुले आणि स्थानिक त्रस्त**

**बेजबाबदार कंत्राटदार याच्यावर कारवाई करण्याची नागरिकांची मागणी**

# घाटकोपर येथील जुन्या ओएनजीसी बिल्डिंगच्या पाडकामामुळे आणि संबंधित कंत्राटदारच्या बेजबाबदारपणामुळे आजुबाजूच्या परिसरातील हवा प्रदूषित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालावलेला आहे.या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.तर काही दिवसांपूर्वी घाटकोपरमध्ये वाईट प्रदूषित हवेची नोंद झाली होती. गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालावलेला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.याआधीही काही भागात बांधकामे बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते.आणि नंतर उठवण्यात आले.गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालावला असून मुंबईकरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.महानगरपालिका प्रशासनाने हवेचा दर्जा सुधारण्यासाठी विविध उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.दरम्यान घाटकोपर पश्चिम अमृत नगर येथील बँक ऑफ इंडिया समोर असलेल्या जुन्या पडीक ओएनजीसीच्या बिल्डिंग आता तोडल्या जात आहे.मात्र या पाडकामामुळे आणि संबंधित ठेकेदारच्या बेजबाबदारपणामुळे आजुबाजूच्या परिसरात धुळीचे वातावरण पसरले असून या भागातील हवा देखील प्रदूषित होत चालली आहे.तसेच हवेची गुणवत्ता ही ढासाळत चालली आहे.याशिवाय बाजूलाच मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती आणि शाळा देखील असल्यामुळे स्थानिक नागरिक आणि शाळकरी मुले यांना या धुळीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे याठिकाणी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ही ऐरणीवर येत आहे.तसेच यासाठी संबंधित पाडकामाचा कंत्राटदार यावर कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना करताना दिसत नसून त्याचा बेजबाबदारपणा या सर्वाला कारणीभूत असल्याचे याठिकाणी दिसत आहे.पाडकामाच्या कंत्राटदाराकडून दिखाव्यापूरती याठिकाणी उपाययोजना केल्या गेल्या असल्या तरी त्या तुटपुंजी स्वरूपाच्या असल्याचे याठिकाणी दिसत आहेत.तसेच जरी या केंद्र सरकारच्या बिल्डिंग असल्यातरी संबंधित मुंबई महानगरपालिका एन विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी बेजबाबदार कंत्राटदार याच्यावर कारवाई करावी असे नागरिकांचे म्हणणे आहे.



# गोगांव येथे श्री कल्लेश्वर मंदीराचा कळसारोहण कार्यक्रम जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य भगवदपादरु यांचे हस्ते संपन्न

## पंचवीस हजाराहून अधिक जन समुदायाची उपस्थिती

**लाडके आमदार श्री सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्य मंत्री सिध्दाराम म्हेत्रे,श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले,श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे,माजी कृषि सभापती मल्लिकार्जुन पाटील, उद्योगपती सुमित पाटील, बसवराज शेळके,भाजपाचे तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड,स्वामीनाथ नागुरे,अविनाश मडीखांबे,आनंद तानवडे मलपा निरोळी, यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच सह भक्त गण उपस्थित होते**





**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

अक्कलकोट (कमलाकर सोनकांबळे) : गोगांव (ता.अक्कलकोट) येथील श्री कल्लेश्वर मंदिराचे कळसारोहण श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य भगवदपादरु, महाकाशिपीठ यांच्या अमृतहस्ते संपन्न झाला.यावेळी श्री म.नि. प्र. राजशेखर महास्वामीजी नंदगांव, श्री म.नि.प्र. बसवलिंग महास्वामी विरक्त मठ अक्कलकोट,श्री म.नि.प्र.प्रशांत महास्वामी विरक्त मठ हत्तीकणबस,श्री मनि.प्र.शिवलिंग महास्वामी विरक्त मठ वागदरी, श्री.ष.ब्र.श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी संस्थान मठ नागणसुर या पूज्य महास्वामीजींची उपस्थिती होती.

दरम्यान ९ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ५ ते ८ श्री कल्लेश्वरास रुद्राभिषेक, सकाळी ९:०० वाजता दांपत्य पुजन, करून सरपंच सौ वनिता सुरवसे व उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते आरोग्य शिबिर उदघाटन करून सकाळपासून संध्याकाळपर्यंत आरोग्य शिबीर घेण्यात आले आरोग्य शिबिर संयोजक पद्मवती माता मल्टीस्टेट बँक, वागदरी यांच्या वतीने करण्यात आले होते .

सायंकाळी . ह.भ.प.श्री काशिनाथ महाराज गुरव (हसापूर) यांचे प्रवचनास सुरुवात झाली व सायंकाळी ६:०० वा. लक्ष दिपोत्सव सोहळा श्री म.नि.प्र. राजशेखर शिवाचार्य महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात संपन्न झाला. हजारो भाविकांनी लक्षद्वीप कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला. तदनंतर रात्री श्री हनुमान भजन मंडळ, उजनी, ता. औसा व श्री हनुमान भजन मंडळ, खैराट तसेच शिवभजन मंडळ चिंचोळी .संभाजी घरे महाराज, गोराळ ता. निलंगा यांजकडून भजन, भारुड व जागरणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सोमवारी श्री कल्लेश्वर महाराजांच्या पालखी व कळस समारंभ हजारो सुहासिनींकडून गंगास्थळ व कुंभ मिरवणूक मोठ्या उत्सवाने काढण्यात आली. हरिभजन मंडळ वेदांत आश्रम शाळा, शेळगांव बार्शी यांचे भक्ती संगीत कार्यक्रम सोबत श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य भगवदपादरु महाकाशिपीठ यांचे वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली त्यानंतर त्याच्या अमृतहस्ते कळसारोहण कार्यक्रम संपन्न झाला.

अन्नदान सेवा दि. ८,९, १० फेब्रुवारी रोजी श्री मल्लप्पा अमृत कलशेट्टी, श्री मधुकर चंद्रकांत सुरवसे, दत्तात्रय हणमंतराव पाटील,रमेश लक्ष्मण बिराजदार (इंजिनियर) यांच्यावतीने करण्यात आली होती कार्यक्रमाचे सूनियोजन कलेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोक मुलगे, खजिनदार प्रदीप जगताप, सचिव संजय सुरवसे, मधुकर सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे दत्तात्रय पाटील, यासह ट्रस्ट विश्वस्त, पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले



### अर्थ सेवेबरोबर समाज सेवा

**पद्मावती फाउंडेशनच्या वतीने गोगाव येथे रक्तदान शिबिर तसेच नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. गोगाव येथे कल्लेश्र्वर कळसारोहण कार्यक्रमाच्या निमित्ताने पद्मावती मल्टीस्टेटच्या वतीने या शिबिरांचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन गावाच्या सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे उपसरपंच श्री.कमलाकर सोनकांबळे आणि मंदिर कमिटीचे अध्यक्ष श्री. अशोक मुलगे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, तसेच जेष्ठ नागरिक व महिलांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व स्वयंसेवक व आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी सुरेश पाटील, विभागीय अधिकारी वग्गे सर,शाखाधिकारी मोहम्मद नबी आणि क्लर्क इरेश बिराजदार उपस्थित होते यावेळी भविष्यात अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.**

### अथांग समुद्रासारखे...

**आपल्या गावाच्या,माता भगिनीचे, कार्यकर्त्यांचे, कलेश्वर देवस्थान ट्रस्ट सर्व विश्वस्त, ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य सर्व कर्मचारी श्रमदान केलेले सर्व भक्त व देवावरील भक्ती शब्दामध्ये कौतुक कितीही केले तरीही ते न संपणारे आहे.. अर्थातच अथांग समुद्रासारखे... .. खूप छान कळसरोहन चे कार्य पार पडले आपल्या कल्लेश्र्वर महाराजांचे आशीर्वाद सर्वावर राहतील यात्रे पेक्षाही खूपच मोठा आणि चांगला कार्यक्रम झाला,३ दिवस महाप्रसाद ची सोय, भरपूर पाणी, गांव आणि घरे दिवाळी प्रमाणे सजलेली होती, मन प्रसन्न झाले ... अशीच नेहमी आपल्या गोगावं गावावर श्री कल्लेश्र्वर महाराजांचे आशीर्वाद सदैव राहतील सर्वांचे संकट दूर करून सर्वांना निरोगी, सुखात,आनंदात ठेवोत हीच कल्लेश्वर चरणी प्रार्थना आणि हा इतका मोठा सोहळा फक्त आणि फक्त आपल्या सर्वांच्या मदतीने सहकार्याने पूर्णपणे यशस्वी पार पडला त्याबद्दल मी सरपंच सौ वनिता मधुकर सुरवसे आपली सर्वांची सर्व समावेश समाजाची पूर्णपणे मनस्वी आभारी आहे, येणारा पुढील काळात सुद्धा आपण असेच सहकार्य करावे हीच अपेक्षा ठेवते...**

**– सौ वनिता सुरवसे, सरपंच ग्रामपंचायत गोगांव**

### लक्ष दीपोत्सव ठरले सर्वाचे लक्ष वेधी

**गावातील भक्त गणाकडून एक दीप पाच रुपये प्रमाणे एक लाख दीपोत्सव कार्यक्रम एक आगळा वेगळा उपक्रमाने नयन रम्य कार्यक्रम घेण्यात आले दिव्याने मंदिर परिसर प्रकाशमय झाले होते**

### महाप्रसादाचा एक वेगळा चव

**बाहेरून आलेल्या सर्व भक्त पाहुणेरावले मित्र परिवार यांना सलग तीन दिवस महाप्रसादाचे वेग वेगळे चविष्ट पदार्थ खाण्यास मिळाले एक प्रकारचे त्याचे आस्वाद घेताना एक वेगळेच आनंद दिसत होते नियोजन समितीने महिला व पुरुष यांची वेग वेगळी व्यवस्था केल्याने सर्वांकडून कौतुक होत होते.**

### पोलीस प्रशासनाचा चोख बंदोबस्त

**कळसा रोहन कार्यक्रमाचे गर्दी लक्षात घेता स्वत: पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी त्याच्या सर्व टीमना व्यवस्थित नियोजन लावल्याने कार्यक्रम शांततेत पार पडले यावेळी पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे ग्रेड पीएसआय सूर्यकांत बिराजदार पोलीस हवालदार अंगद गीते लक्ष्मण कांबळे पोलीस कॉन्स्टेबल विजय महानोर व गोविंद राठोड सतीश आवले.**

### प्रदीप जगताप यांच्या कामाचे व अचूक नियोजनाचे सर्वत्र कौतुक

**कलेश्वर देवस्थानच्या निस्वार्थ भक्ती भावाने गेल्या दोन महिन्यांपासून कार्यक्रम नियोजनासाठी रात्रदिवस पळापळी करत अचूक नियोजन केल्यामुळे प्रदीप जगताप यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.**

### लेकीने माहेरची कार्यक्रम बघून सुखावली

**अनेक वर्षानू वर्ष बालपणाची सवंगडी भेटल्याने सर्व लेकीच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होते मस्त गप्पा गोष्टी मध्ये जगद्गुरू येण्यास उशीर झालेले ही त्यांना कळत नव्हते कार्यक्रमाच्या शेवट पर्यंत हसत गप्पा चालु होते**







